**महाराष्ट्र राज्य बिगर कृषि सहकारी पतसंस्था**
**नियामक मंडळ, पुणे यांचे कार्यालय, नवीन मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१.**
ई-मेलआयडी-regulatoryboard2019@gmail.com दूरध्वनी क्रमांक-०२०- २६१२२८४६/४७

जा.क्र.पतसंस्था/सआ-५/नियामक मंडळ/NPA मुदतवाढ/सन २०२० १४८३ दिनांक :- ९ /१०/२०२०

# परिपत्रक

**विषय :- कोविड- १९ च्या अनुषंगाने उद्भवलेल्या परिस्थितीमुळे,सहकारी पतसंस्थांच्या अनुत्पादक जिंदगी (एनपीए) वर्गीकरणाचा कालावधी शिथिल करणेबाबत.**

**संदर्भ** :- १. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडील दि.१०/११/२००४, २१/१२/२००४ व ५/२/२०११ रोजीचे परिपत्रक.

२. महाराष्ट्र राज्य बिगर कृषी सहकारी पतसंस्था नियामक मंडळ, पुणे यांचे परिपत्रक दि.२७/०३/२०२०.

३. महाराष्ट्र राज्य बिगर कृषी सहकारी पतसंस्था नियामक मंडळ, पुणे यांच्या दि.२४/०९/२०२० रोजीच्या समिती सभेतील निर्णय.

राज्यातील सहकारी पतसंस्थांना संदर्भ क्र.१ मधील दि.१०/११/२००४ चे परिपत्रकान्वये अनुत्पादक जिंदगी (एनपीए) चे निकष लागू करण्यात आलेले आहेत. त्यानुसार उत्पन्न संकल्पना, अनुत्पादक जिंदगी वर्गीकरण व तरतुदी याबाबतचे निकष निश्चित करण्यात आलेले आहेत. एखाद्या कर्जखात्यावरील व्याजाचा हप्ता किंवा कर्जाचा हप्ता किंवा कर्ज व व्याजाचा हप्ता हा ठरवून दिलेल्या कालावधीनंतरही वसूल न झाल्यास असे खाते म्हणजे अनुत्पादक जिंदगी (एनपीए) होय. सदरचे एन.पी.ए निकष केवळ कर्जासाठी लागू नसून सर्व प्रकारच्या अनुत्पादक जिंदगीसाठी लागू आहेत.

उपरोक्त संदर्भ क्र.१ मधील दिनांक २१/१२/२००४ चे परिपत्रकान्वये, अनुत्पादक जिंदगीच्या वर्गीकरणाबाबत लागू करण्यात आलेली तरतुदीची टक्केवारी नमूद केलेली असून दि.५/२/२०११ परिपत्रकान्वये पतसंस्थांकरीता अनुत्पादक जिंदगी (एनपीए) ठरविण्याचा थकीत कालावधी सहामाही करण्यात आला आहे.

उपरोक्त संदर्भ क्र.२ मधील दिनांक २७/३/२०२० चे परिपत्रकान्वये, कोविड-१९ च्या उद्भवलेल्या पार्श्वभूमीवर, सहकारी पतसंस्थांच्या कर्ज वसुलीवर होणारा परिणाम विचारात घेऊन, सन २०१९-२०२० या आर्थिक वर्षासाठी राज्यातील पतसंस्थांकरिता अनुत्पादक जिंदगीच्या निकषात बदल करुन सध्या प्रचलित असलेला अनुत्पादक जिंदगी ठरविण्याचा कालावधी सहामाही ऐवजी नऊ महिने करण्यात आलेला होता.

त्याचप्रमाणे, उपरोक्त संदर्भ क्र. ३ अन्वये, महाराष्ट्र राज्य बिगर कृषी सहकारी पतसंस्था नियामक मंडळाच्या दि.२४/०९/२०२० रोजीच्या सभेत घेणेत आलेल्या निर्णयानुसार, कोविड-१९ च्या उद्भवलेल्या परिस्थितीमुळे, सन २०२०-२१ या आर्थिक वर्षासाठी राज्यातील पतसंस्थाकरिता अनुत्पादक जिंदगी (एनपीए) ठरविण्याचा थकीत कालावधी सहा महिन्याऐवजी एक वर्ष करण्यात येत आहे.

त्यानुसार, राज्यातील सहकारी पतसंस्थांनी सन २०२०-२१ या आर्थिक वर्षाकरिता उत्पादक जिंदगी (Standard Asset) चे अनुत्पादक जिंदगी (Non Performing Asset) मध्ये वर्गीकरण करणेबाबत खालीलप्रमाणे कार्यवाही करावी.

१. दिनांक- ३१ मार्च, २०२१ अखेर एन.पी.ए वर्गीकरण तक्ता खालीलप्रमाणे लागू असेल :-

| अ. क्र. | एनपीए वर्गवारी | व्याज किंवा मुद्दल अथवा दोन्ही **थकीत कालावधी** | व्याज किंवा मुद्दल अथवा दोन्ही **एनपीए कालावधी** |
|---|---|---|---|
| १ | उत्पादक कर्ज (Standard Asset) | १२ महिने पर्यंत | शून्य महिने |
| २ | अनियमित कर्ज (Sub-Standard Asset) | १२ महिन्यापेक्षा जास्त परंतु २४ महिन्यापेक्षा कमी | १ महिन्यापेक्षा जास्त परंतु १२ महिन्यापेक्षा कमी |
| ३ | संशयित कर्ज-१ (D-१) | २४ महिन्यापेक्षा जास्त परंतु ४८ महिन्यापेक्षा कमी | १२ महिन्यापेक्षा जास्त परंतु ३६ महिन्यापेक्षा कमी |
| ४ | संशयित कर्ज-२ (D-२) | ४८ महिन्यापेक्षा जास्त परंतु ६० महिन्यापेक्षा कमी | ३६ महिन्यापेक्षा जास्त परंतु ४८ महिन्यापेक्षा कमी |
| ५ | संशयित कर्ज-३ (D-३) | ६० महिन्यांच्या पुढे | ४८ महिन्यांच्या पुढे |
| ६ | बुडीत कर्ज (Loss Asset) | वैधानिक लेखापरीक्षकांचे शिफारशीनुसार | वैधानिक लेखापरीक्षकांचे शिफारशीनुसार |

२. सदर वर्गीकरण निकषाचा कालावधी हा केवळ सन २०२०-२१ या आर्थिक वर्षाकरिता नव्याने अनुत्पादक (एन.पी.ए) होणा-या कर्जासाठी लागू राहील.

३. वरीलप्रमाणे कोणत्याही कर्ज खात्याच्या मुद्दल अथवा व्याज किंवा दोन्हींचा थकबाकी कालावधी १२ महिन्यापेक्षा अधिक होत असल्यास खाते अनुत्पादित किंवा एन.पी.ए होणार असल्याने थकीत कालावधी व एन.पी.ए कालावधी यामध्ये १२ महिन्यांचा फरक असेल.

४. कॅश क्रेडीट किंवा ओव्हरड्राफट कर्ज खात्याच्या बाबतीत असे खाते १२ महिने सतत नियमबाहय (Out of Order) असेल तर ते खाते एनपीए मध्ये समाविष्ट होईल.

५. सदर अनुत्पादक जिंदगी (एन.पी.ए) ठरविण्याचा थकीत कालावधीमध्ये वरील प्रमाणे वर्गीकरण कालावधीत झालेला बदल वगळता अन्य निकष संदर्भ क्र. १ मधील परिपत्रकाप्रमाणे कायम राहतील.

राज्यातील सहकारी पतसंस्थांनी अनुत्पादक जिंदगीच्या निकषाबाबत सन २०२०-२१ या आर्थिक वर्षाकरिता वरीलप्रमाणे कार्यवाही करावी.

( अनिल कवडे )
**अध्यक्ष, नियामक मंडळ**
**तथा सहकार आयुक्त व निबंधक,**
**सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे**

प्रति-

१. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था (प्रशासन / लेखापरीक्षण) (सर्व)
२. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था (सर्व)
३. जिल्हा विशेष लेखापरीक्षक (वर्ग-१), सहकारी संस्था (सर्व)
४. अध्यक्ष, नागरी / ग्रामीण / कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्या., (सर्व).
५. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन मर्या., मुंबई
सीटीसी क्र.११९/बी, तिसरा मजला, प्रमिला अपार्टमेंट, लकाकी बंगलोशेजारी, लकाकी रोड, मॉडेल कॉलनी, शिवाजीनगर, पुणे-४११ ०१६.
६. अध्यक्ष/व्यवस्थापक, नागरी / ग्रामीण बिगर शेती / कर्मचारी सहकारी पतसंस्थांचे फेडरेशन (सर्व).

प्रत माहितीसाठी-

१. अपर आयुक्त व विशेष निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२. अपर निबंधक सहकारी संस्था (प्रशासन / लेखापरीक्षण) (सर्व) मुख्यालय, पुणे.
३. मा.प्रधान सचिव (सहकार) , सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय मुंबई- ३२ (सविनय सादर).